खोडकर कावळा

इरिना हेल

मराठी: अश्विनी बर्वे



एकदा, कॉन्स्टन्टाईन आणि मरीना ही दोन मुले उन्हाळा घालवण्यासाठी कीव शहरातील त्यांच्या हिवाळी घरातून गावी आली होती. तिथे, बागेत त्यांना एक जखमी पायाचा लहान कावळा सापडला. त्यांनी त्याला ठेवून घेण्याचे ठरवले आणि त्याचे नाव 'क्रॅ-क्रॅ' ठेवले.

पाळीव प्राणी म्हणून क्रॅ-क्रॅ खूप मजेशीर होता, पण मुलांना लवकरच कळले की तो खरंच खूप खोडकर कावळा होता. एके दिवशी, वर्गात असताना, क्रॅ-क्रॅ उडून खोलीत आला आणि त्याने मुलांच्या शालेय पुस्तकांवर सगळीकडे शाई सांडली. आणि जेव्हा कपडे दोरीवर वाळत असत, तेव्हा क्रॅ-क्रॅ सगळ्या चिमट्या काढून टाकत असे! जेव्हा सगळ्यांना वाटले की क्रॅ-क्रॅच्या खोड्या संपल्या आहेत, तेव्हा त्याने खिडकीतून इतर कावळ्यांना आत आणले आणि त्यांनी मरीनाच्या वाढदिवसाच्या पार्टीसाठी ठेवलेले स्वादिष्ट जेवण फस्त केले. आता पुरे झाले होते.

कॉन्स्टन्टाईन आणि मरीनाला क्रॅ-क्रॅला जंगलात घेऊन जाण्यास आणि त्याला सोडून देण्यास सांगितले गेले. पण जेव्हा मुले परत येण्याचा मार्ग चुकली, तेव्हा क्रे-क्रानेच त्यांना घरी पोहोचवले. त्याला त्या कुटुंबासोबत राहण्याची परवानगी मिळाली— आणि त्याने आपल्या खोड्या करणे सुरूच ठेवले!

या प्रेमळ क्रे-क्राची ही मजेशीर गोष्ट खरी असून, ती इरिना हेलला तिच्या काकांनी सांगितली होती. चमकदार, आकर्षक चित्रांमधून मुलांची आणि त्यांच्या पाळीव प्राण्याची साहसे आणि गमतीजमती जिवंतपणे समोर येतात.

खोडकर कावळा



इरिना हेल

मराठी: अश्विनी बर्वे



आजोबा आपल्या झोपाळ्यावर झोके घेत होते आणि दूरवर पसरलेल्या कावळ्यांच्या थव्याकडे पाहत होते. "ते पक्षी मला एका गोष्टीची आठवण करून देतात..." ते म्हणाले.



एके काळी कॉन्स्टन्टाईन नावाचा एक मुलगा आणि मरीना नावाची एक मुलगी, अशी दोन मुले होती. ते त्यांच्या आई-वडिलांसोबत आणि त्यांची दाई, नियानिया, यांच्यासोबत दूरवरच्या कीव शहरात राहत होते.



हिवाळा खूप लांब आणि कडाक्याचा होता आणि मुले बर्फ वितळण्याची आतुरतेने वाट पाहत होती, जेणेकरून त्यांना शहरातून गावाकडच्या त्यांच्या घरी जाता येईल.



नियानियाने त्यांची खेळणी आणि कपडे बांधले आणि सर्व तयारी झाल्यावर, ते कुटुंब त्यांना नदीतून खाली घेऊन जाणाऱ्या पॅडल स्टीमरमध्ये चढले.







तो एक लांबचा प्रवास होता, पण अखेरीस ते पोहोचले. इवाश्का, तबेला सांभाळणारा मुलगा, त्यांना घरी घेऊन जाण्यासाठी धक्क्यावर वाट पाहत होता.



ते गाडीत चढले आणि सूर्यफुलांच्या शेतांजवळून धुळीच्या वाटेने खडखडत पुढे जाऊ लागले. आपल्या उन्हाळी घराच्या फाटकात वळल्यावर, त्यांना स्वयंपाकीण अवदोतिया, माळी ग्रिशा आणि मोलकरीण माशा त्यांचे स्वागत करायला धावत आलेले दिसले. मुलांनी मिठी मारून घेतली आणि मग गेल्या वर्षीसारखेच सर्व काही आहे की नाही हे पाहण्यासाठी ते थेट माळ्यावरील त्यांच्या खोलीत गेले. खिडकीतून बाहेर डोकावल्यावर, त्यांना बागेतील उंच झाडाखाली काहीतरी लहान आणि काळे पडलेले दिसले. "ते काय आहे?" कॉन्स्टन्टाईन म्हणाला. "चल जाऊन पाहूया," मरीना म्हणाली.



गवतावर त्यांना एक लहान कावळा सापडला, ज्याचा एक पाय जखमी होता. तो घरट्यातून खाली पडला असावा असे दिसत होते. "बिचारा," मरीना म्हणाली.“ आपण त्याला ठेवूया," कॉन्स्टन्टाईन म्हणाला. "आपण त्याला काय नाव देऊ?"

"क्रॅ-क्रॅ," कावळा ओरडला. आणि मग त्याचे नाव क्रॅ-क्रॅ झाले.









मुलांनी त्या कावळ्याला उचलून नियानियाला दाखवण्यासाठी काळजीपूर्वक घरात आणले. ती मुरुमापासून ते रागापर्यंत काहीही बरे करू शकत होती. नियानियाने त्या लहान कावळ्याचा पाय सरळ ठेवण्यासाठी लाकडाच्या दोन तुकड्यांमध्ये पट्टी बांधली.तात्काळ, कॉन्स्टन्टाईनला आणि मरीनालाही आपल्या पायासाठी लाकडी पट्टी हवी होती.

क्रे-क्राचा मुलांना फार लळा लागला होता. तो दिवसभर त्यांच्या मागे-मागे फिरायचा आणि त्यांच्या सर्व खेळांमध्ये सामील व्हायचा.

त्याला अंघोळीची वेळ खूप आवडायची, आणि जेव्हा तो नियानियाला पाण्यात मूठभर भूर्जपत्राची पाने ढवळताना बघायचा, तेव्हा त्यालाही अंघोळ करायची आहे हे सांगण्यासाठी तो कर्कश आवाज काढायचा

.क्रॅ-क्रॅला पाळीव प्राणी म्हणून ठेवण्यात खूप मजा यायची. पण तो एक खूप खोडकर कावळा होता, हे मुलांच्या लवकरच लक्षात आले. एके दिवशी, ते त्यांच्या शिक्षकासोबत अंकगणित शिकत होती, तेव्हा क्रॅ-क्रॅ उडून खोलीत आला. तो मरिनाच्या डेस्कवर बसला आणि तिच्या वहीवर सगळीकडे शाई सांडली. तिने पटकन त्याला बागेत हाकलून दिले.





तिथे, माशा कपडे वाळत घालत होती. तेवढ्यात क्रॅ-क्रा उडून आला, आणि माशा कपडे वाळत घालत असतानाच, क्रॅ-क्राने चिमटे काढले, ज्यामुळे सगळे कपडे चिखलात पडले.

"त्या कावळ्याला पिंजऱ्यात टाकलं पाहिजे," मम्मा ओरडली. "तात्काळ."





म्हणून मुलांनी जत्रेत जायचं ठरवलं तेव्हा त्याला घरीच ठेवायचं ठरलं पण तो कसातरी पिंजऱ्यातून बाहेर पडला आणि उडाला..


“तो बघ " कॉन्स्टेंटाइन अचानक ओरडला..
“तो क्रा-क्रा आहे..“


क्रे-क्राने त्यांच्या ड्रमला चोच मारून छिद्र पाडले आहे हे पाहून संगीतकारांना प्रचंड राग आला आणि नाचवणारा अस्वल मिशा नाराज दिसत होता, कारण या सगळ्या गोंधळात त्याला नाचताना कोणीही पाहत नव्हते.





मरीना आणि कॉन्स्टन्टाईन यांना घाईघाईने घरी आणण्यात आले. क्रे-क्राची फजिती झाली होती.मुलांनी त्याऐवजी आईच्या बेडरूममध्ये वेशभूषा करून खेळायचे ठरवले."मी सेंट जॉर्ज आहे," कॉन्स्टन्टाईन म्हणाला, हातात झाडू फिरवत आणि त्यांचा कुत्रा बुरियाच्या पाठीवर बसत."मी राजकुमारी आहे," मरीना म्हणाली. "आपण ड्रॅगनसाठी काय करूया?“ "क्रे-क्रा ड्रॅगन होऊ शकतो," कॉन्स्टन्टाईनने जाहीर केले.क्रे-क्राला ड्रॅगन व्हायचे नव्हते. एक कर्कश आवाज करत तो आवाक्याबाहेर उडून गेला, ज्यामुळे बुरिया घाबरला आणि त्याने कॉन्स्टन्टाईनला जमिनीवर फेकून दिले. आईची पावडर सांडली आणि तिचा हार गालिच्यावर पडला. क्रे-क्रा तो घेण्यासाठी खाली झेपावला आणि मग सरळ खिडकीतून बाहेर उडून गेला.क्रॅ-क्राने उंच झाडात आश्रय घेतला, त्याच्या चोचीत अजूनही तो हार होता. मरिना त्याच्यामागे बागेत धावत गेली.





क्रे-क्राने त्यांच्या ड्रमला चोच मारून छिद्र पाडले आहे हे पाहून संगीतकारांना प्रचंड राग आला आणि नाचवणारा अस्वल मिशा नाराज दिसत होता, कारण या सगळ्या गोंधळात त्याला नाचताना कोणीही पाहत नव्हते. मरीना आणि कॉन्स्टन्टाईन यांना घाईघाईने घरी आणण्यात आले. क्रे-क्राची फजिती झाली होती.

मुलांनी त्याऐवजी आईच्या बेडरूममध्ये वेशभूषा करून खेळायचे ठरवले."मी सेंट जॉर्ज आहे," कॉन्स्टन्टाईन म्हणाला, हातात झाडू फिरवत आणि त्यांचा कुत्रा बुरियाच्या पाठीवर बसत.

"मी राजकुमारी आहे," मरीना म्हणाली. "आपण ड्रॅगनसाठी काय करूया?“ "क्रे-क्रा ड्रॅगन होऊ शकतो," कॉन्स्टन्टाईनने जाहीर केले.क्रे-क्राला ड्रॅगन व्हायचे नव्हते. एक कर्कश आवाज करत तो आवाक्याबाहेर उडून गेला, ज्यामुळे बुरिया घाबरला आणि त्याने कॉन्स्टन्टाईनला जमिनीवर फेकून दिले. आईची पावडर सांडली आणि तिचा हार गालिच्यावर पडला. क्रे-क्रा तो घेण्यासाठी खाली झेपावला आणि मग सरळ खिडकीतून बाहेर उडून गेला.क्रॅ-क्राने उंच झाडात आश्रय घेतला, त्याच्या चोचीत अजूनही तो हार होता.मरिना त्याच्यामागे बागेत धावत गेली.







लगेच खाली उतर, खोडकर पक्ष्या," ती ओरडली.
ती झाडावर चढू लागली, पण तिचा परकर एका फांदीत
अडकला आणि ती तिथेच राहिली. सगळे धावत आले.
क्रॅ-क्रा घाबरला आणि त्याच्या हाराखाली आला, आणि
मरीनाला शिडीच्या साहाय्याने वाचवावे लागले. क्रॅ-क्रा
पुन्हा एकदा अपमानित झाला होता..




मग मरिनाचा वाढदिवस आला. सहलीचे आयोजन केले होते आणि चुलत भावंडांना आमंत्रित केले होते. क्रॅ-क्रॅ नीट वागतोय की नाही हे पाहण्यासाठी कॉन्स्टन्टाईनला घरीच थांबावे लागले. "हे बरोबर नाही," कॉन्स्टन्टाईन कुरकुरला. "क्रॅ!" कावळा म्हणाला. "त्यांच्या त्या भयंकर सहलीवर पाऊस पडावा अशी माझी इच्छा आहे." "क्रॅ-क्रॅ!" कावळा म्हणाला."गाडीचे चाक तुटून पडावे अशी माझी इच्छा आहे," कॉन्स्टन्टाईन म्हणाला. "क्रॅ-क्रॅह!" डोळ्यात खोडकर चमक आणत कावळा म्हणाला. थोड्याच वेळात ते कुटुंब पूर्णपणे भिजलेले आणि पायी परत आले.



"काय झालं असेल याचा तुम्ही अंदाजही लावू शकणार नाही," मरीना म्हणाली. "मुसळधार पाऊस पडला, आमची गाडी चिखलात अडकली आणि एक चाक निखळून पडलं. आम्ही सगळेच खूप चिडलो होतो.""आणि आता तरी आपण तुझ्या कावळ्याला दोष देऊ शकत नव्हतो," बाबा थट्टा करत म्हणाले. "तो चांगला वागला का?"

"अगदीच चांगला!" कॉन्स्टन्टाईन म्हणाला.






तो घाईने बोलला. जेव्हा ते सर्वजण वाढदिवसाच्या मेजवानीसाठी जेवणाच्या खोलीत गेले, तेव्हा त्यांना कळले की क्रा-क्रा आणि त्याचे मित्र खिडकीतून उडून आत आले होते. त्यांना पार्टीला यायचे होते.



“हे आता पुरे झालं," बाबा गरजले. "त्या पक्ष्याला जायलाच पाहिजे." मुलं खूप रडली! पण आई-वडील ठाम होते. आता आणखी रडगाणं नाही.






दुसऱ्या दिवशी मुलांना क्रॅ-क्राला एका टोपलीत ठेवायचे होते, आणि इवास का त्यांना गाडीने खूप दूर एका जंगलात घेऊन गेला, जिथे क्रॅ-क्राला मुक्त करायचे होते.





काम झाल्यावर, आपला कावळा त्याच्या नव्या जगाच्या हिरव्या पानांमध्ये दिसेनासा होताना पाहून मुलांना खूप वाईट वाटले आणि ते गाडीत चढले. "आपल्याशिवाय तो कसा निभावेल?" मरीना काळजीने म्हणाली. ते जंगलाच्या वाटेने खडखडाट करत परत निघाले, इतक्यात इवाश्का गहू कापणाऱ्या काही शेतकऱ्यांशी गप्पा मारण्यासाठी थांबली.

अचानक कावळ्यांचा एक थवा आकाशात उडाला, आणि मग झाडांच्या दिशेने झेपावला."बघा!" कॉन्स्टन्टाईन घाबरून ओरडला. "कदाचित ते इजा करतील."






मुले जंगलात परत पळाली, पण क्रा-क्राचा कुठेच पत्ता नव्हता. त्यांच्या सभोवताली उंच, काळी झाडे उभी राहिली होती आणि त्यांच्या फांद्या करकरत व डोलत होत्या. "इवाश्का! इवाश्का!" ते ओरडले, पण त्यांचे आवाज वाऱ्यासोबत वाहून गेले. मग, झुडपांमधून वाऱ्यापेक्षाही मोठा, काहीतरी तुटल्याचा आणि तडतडल्याचा आवाज आला. मुले एकमेकांना बिलगून, घाबरून पाहत राहिली, कारण झुडपांमधून एक नाक बाहेर आले होते. ते एक अस्वल होते.








.. साखळीने बांधलेले एक अस्वल. मिशा, त्याच्या रखवालदारासोबत बाहेर उभे होते. "छोट्या कबुतरांनो, या जंगलाच्या मधोमध तुम्ही काय करत आहात?" रखवालदाराने विचारले. “आम्ही आमचा कावळा हरवला आहे! आणि घरी जाण्याचा रस्ताही," मरीना म्हणाली. रखवालदाराने एक चमकदार काळे पीस वर उचलले. "हे मला वाटेवर सापडले," तो मागे बोट दाखवत म्हणाला..

झाडांमधून वळणदार वाटेने जात ते अखेरीस जंगलाच्या कडेला पोहोचले. तिथे दूरवर त्यांचे घर होते.



“पण व्हरांड्यावर कोण बसलं होतं? हो ना? हो, तोच होता!” क्रॅ-क्रॅ!तो उडत पुढे आला होता आणि त्यांची वाट पाहत होता.




घरातले सर्वजण धावत आले,

“आम्हाला फार काळजी वाटत होती.” ते सगळे म्हणाले..

“जेव्हा इवाश्का तुझ्याशिवाय परत आला तेव्हा आम्हाला वाटले की जंगली जानवराने तुला खाल्ले असेल.”


तेव्हा अस्वलाच्या रखवालदाराने सांगितले की त्याने मुलांना जंगलात भटकतांना बघितले होते.



“तो खरंतर क्रा-क्रा होता ज्याने घराचा रस्ता दाखवला.” मरीना म्हणाली.
“त्याने आमच्यासाठी एक निशानी सोडली आपला पंख.. कृपया त्याला माफ करा आणि त्याला आमच्याबरोबर राहू द्या.”


आईने वडिलांकडे बघितले आणि त्यांनी मान हलवली.

“आम्ही क्रा-क्राला एक संधी देऊ.” ते म्हणाले.





ते सर्व चहा प्यायला बसले आणि मुलांनी परत त्यांचे साहस सगळ्यांना सांगितले. अचानक बाबांनी त्यांच्या तोंडावर हात ठेवला..



“ही खूप मज़ेदार गोष्ट आहे,” ते म्हणाले, “मी शपथ घेऊन सांगतो मी माझा चष्मा घातला होता.पण आता तो गायब आहे. तो कुठे असेल?? क्रा-क्रा? क्रा-क्रा...!"

समाप्त